REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 6 | MARCH - 2017


# " मराठी , ख्रिस्ती साहित्य चळवळ "

**प्रा. डॉ. अनिता परभतराव खंडागळे**
**मराठी विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय,**
**चिंचोली (लिं,), ता. कन्नड, जि. औरंगाबाद.**

**प्रस्तावना :**

खिस्ती साहित्याची सुरुवात ही साडेचारशे वर्षापूर्वी झाली. खिंस्ती लेखकांचे प्रमाण फारच नाही परंतु एक दोन लेखक खिस्ती साहित्य लेखन करतांना दिसतात. खिस्ती साहित्य चळवळीचा विचार केला तर फारशी कोठे ही चळवळ दिसत नाही. ओॲसिसप्रमाणे महाराष्ट्रात काही ठिकाणी ख्रिस्ती लेखक साहित्य लेखन करतांना दिसून येतात. मात्र ख्रिस्ती साहित्याचा विस्तार मोठया प्रमाणात झालेला दिसून येत नाही.

इतिहासाचा अभ्यास केला तर असे दिसून येते की, मराठी साहित्यामध्ये ख्रिस्ती लेखक पाईकाची भूमिका घेतांना दिसतात. मराठी सामाजिक कादंबरी, मराठी भाषाकोश, व्याकरणाची जडणघडण, मराठी मुद्रणकलेची सुरुवात, नवसाहित्याची सुरुवात या सर्व साहित्य क्षेत्रात याचा प्रत्यय येतो. ख्रिस्ती मराठी साहित्याचे योगदान बघितल्यास असे दिसून येते की, साडेचारशे वर्षापूर्वी फादर थॉमस स्फीफन यांचे योगदान महत्वपूर्ण आहे.



जैसी पुष्पांमाजी पुष्प मोगरी |
कि परिमळामाजी कस्तुरी ||
तैसी भासांमाजी साजरी |
मराठिया ||

मराठी भाषेमध्ये मोगरा, कस्तुरी यांच्या सुंगधा प्रमाणे 'ख्रिस्ती पुराण' या ग्रंथाची जडणघडण झालेली आहे. हा ग्रंथ १०,९६२ ओवीचा आहे. या ग्रंथाची बांधणी देवनागरी लिपीत त्यांनी १६११ ते १६१२ या दरम्याण केली आहे. 'ख्रिस्ती पुराण' हा ग्रंथ तत्कालीन मराठी पंडीती मध्ये लिहिला गेला. त्यामुळे तत्कालीन सर्व सामान्य व्यक्तीला समजण्यासाठी कठीण गेला.

त्यानंतर इ. स. १६२९ मध्ये ऐतियन देला क्रुवा या फ्रेंच जेज्वीट धर्मगुरुने 'संत पीटरचे पुराण' हा ग्रंथ लिहून प्रकाशित केला. हा ग्रंथ ख्रिस्ती पुराण प्रमाणेच समाजामध्ये प्रसिध्द झाला. इ. स. १६५५ मध्ये 'सांतु अंतोतिची जीवित कथा' हा ग्रंथ प्रकाशित झाला. याच काळात फादर सांव मिंगेत यांनी 'विवेकमाला' हा ग्रंथ लिहिला. यातून ख्रिस्ती साहित्यिकांला मराठी भाषे बद्दल जिव्हाळा आकर्षण होते. यातूनच हया साहित्याची निर्मिती झाली आहे. शिवकाळापासून 'पुराण' या ग्रंथाचे महत्व आजपर्यंत मराठी साहित्य क्षेत्रात कसे टिकुण आहे. या संदर्भात इतिहासकार अ. का. प्रियोळकर म्हणतात. " पुराण १६५८ लिस्बन येथे प्रसिध्द झाले असे म्हणतात. याची पहिली प्रत हिंदुस्थानात किंवा युरोपातील कोणत्या ही ग्रंथालयात असल्याचा थांगपत्ता पुष्कळ शोध व पत्रव्यवहार करुन ही लागला नाही. त्याची दुसरी आवृत्ती मुंबई येथे जानेवारी १९४७ मध्ये सिं. अन्तेनिक गोन्सालव्हिस पुराणे शास्त्री यांनी मुद्रित केली. वांद्रे येथे ज्या ठिकाणी आज कत्तलखाना आहे त्याच ठिकाणी पूर्वी जेजुइटांचे मोठे कॉलेज होते. त्याच ठिकाणी या ग्रंथाची रचना झाली असे म्हणतात. या पुराणाचे एकंदर छत्तीस अध्याय आहेत त्यांना तो 'कथा' असे नाव देतो. स्फिफन्सने ज्या प्रमाणे ज्ञानेश्वरी वगैरे मराठी ग्रंथाच्या धर्तीवर आपल्या पुराणाची रचना केली तशी या पुराणकाराणे केली नाही. मूळ पोर्तुगीज ग्रंथ ज्या वृत्तात होता त्याच वृत्ताच्या धर्तीवर ही देशी रचना त्याने केली असावी. "

सतराव्या - अठराव्या शतकात साहित्यकृती निर्माण झाल्या. त्या साहित्यकृती पाठीमागे धार्मिक भावना होत्या. याच धार्मिक भावनेतून

ख्रिस्ती साहित्याने समाजचे धार्मिक व सामाजिक प्रबोधन केल्याचे दिसून येते. या साहित्याची खरी प्रेरणा ही सामाजिक उद्‌बोधन, प्रबोधन करणे हा खरा उद्देश होता. अठराव्या शतकापर्यंत महाराट्रभर 'ख्रिस्ती' समाज म्हणून त्याला म्हणता येईल. तो ख्रिस्ती समाज फक्त कॅथलिक पंथीय समाज होता. आजपर्यंत जो ख्रिस्ती समाज महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर होता त्याला इंग्रजांनी महाराष्ट्राच्या अंर्तभागात समाविष्ट केले. पुण्या- मुंबईला ब्राम्हण वर्गातल्या काही लोकांनी प्रोटेस्टंट पंथाच्या नावाखाली ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. त्या महाराष्ट्रीय ब्राम्हण समाजातील साहित्यिक प्रोटेस्टंट समाजाला लाभदायक ठरले.

१८५७ साली मराठी साहित्यात पहिली कादंबरी 'यमुनापर्यटन' या नावाची सामाजिक कादंबरी लिहिणारे बाबा पद्‌मनजी 'वनवासी फूल' रे. ना. वा. टिळक 'स्मृतिचित्रे' रेखाटलाचा लक्ष्मीबाई टिळक या साहित्यिकांनी ख्रिस्ती साहित्याचा प्रवाह निर्माण केला. पंडीता रमाबाई, शाहु दाजी उजगरे, डॉ. विल्यम केरी नवलकर हया साहित्यिकांनी मराठी साहित्यात मोलाचे कार्य केले आहे. १८७४ मध्ये मुलांसाठी 'सचित्र बालबोध मेवा' सुरु करण्यात आला. त्याचे वाङ्मयीन, सांस्कृतीक व ललित अंग जोपासणारे रे. नारायण वामन टिळक या सारखे संपादक त्याला लाभले. सव्वाशे वर्षापुर्वी 'ज्ञानोदय' या मासिकाची साहित्यिक धार मराठी साहित्य क्षेत्रात उद्दयास आली. मराठी साहित्य सतत सव्वाशे वर्षे तग धरुन राहणारे व आपली स्वत:ची अस्मिता व परंपरा टिकवून ठेवणारे मराठी साहित्याच्या परंपरेतील महत्वाचे मासिक होते. या मासिकाव्दारे व छोटया मोठया ग्रंथाच्या माध्यमातून प्रोटेस्टंट समाज आपले साहित्य लेखन करीत असत.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात 'सुवार्ता' मासिकाचे संपादक का. डॉम्निक आब्रिया यांच्या नेतृत्वाखाली प्रोटेस्टंट व कॅथलिक समाजातील होतकरु साहित्यिक एकत्र झाले. त्यांनी संयुक्तपणे मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनाची सुरुवात केली. ख्रिस्ती साहित्य संमेलन बंद पडत होते ते नव्याने चालू केले. या संमेलनाच्या माध्यमातून मराठी ख्रिस्ती साहित्यप्रेमीना साहित्य लेखनाला प्रेरणा मिळाली. मोठ मोठया जोमाने पुण्याला ख्रिस्ती साहित्य संमेलन पार पडले याचे पडसाद वर्तमान पत्रातून दिसून आले. येथुनच खऱ्या अर्थाने ख्रिस्ती साहित्य चळवळीला सुरुवात झाली. या काळात ख्रिस्ती साहित्यिकांनी साहित्य विश्वात आपले अस्तित्व निर्माण केले. त्याच काळात दलित साहित्यिकांनी विद्रोही भाषेत आपला आवाज उठायला सुरुवात केली.

ख्रिस्ती साहित्याची लाट वेगळया स्वरुपाची होती. शांततेच्या माध्यमातून वाटचाल होती. ख्रिस्ती साहित्यात लेखन करणारे अनेक मातब्बर लेखक आहेत. कादंबरीकार, कवी, इतिहासप्रेमी, चरित्रकार, ललित लेखक, कथा लेखक आहेत. वेगवेगळया साहित्य प्रकारात विविध विषय हाताळणारे साहित्यिक आहेत. ख्रिस्ती साहित्यिकाचे वैशिष्टये म्हणजे त्यांचे विषय जरी त्या त्या समाजाशी, धर्माशी निगडीत असले तरी त्यांच्या साहित्यावर मराठी भाषेचा प्रभाव दिसून येतो. मराठी भाषेचा सोज्वळपणा, नाजूकपणा, सहद्‌यता या साहित्यिकांनी ख्रिस्ती साहित्यिकात जपलेली दिसून येते. 'अनायिकाचे प्रेमपत्र अर्थात नवे अंजन' हे खंडकाव्य लिहिणारे शा. दा. उजगरे आपल्या खंडकाव्यातून याची प्रचिती देतात.

देश माझा जो सर्व गुणाधिधान
देवधर्माची ज्या नेहमी प्रधान
करीत त्याचे कार्य यथाशक्ती
हींच वाटे मज खरी देशभक्ती

ख्रिस्ती साहित्य चळवळी सर्व सामान्य लोकांची होती. यात मोजक्याच लोकांनी साहित्य लेखन केले त्यामुळे ख्रिस्ती साहित्याच्याचा जोर वाढलेला दिसून येत नाही. थोडे जे साहित्य लेखन झाले. त्यानंतर नविन असे साहित्य लेखन झाल्याचे दिसून येत नाही.

**संदर्भसुची :**

१. वाङ्मयीन चळवळी आणि दृष्टीकोण : संपादक - सुमती लांडे.
२. दलित साहित्य : वेदना व विद्रोह - भालचंद्र फडके.
३. अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : प्राचार्य डॉ. वसंत बिरादार.



**प्रा. डॉ. अनिता परभतराव खंडागळे**
**मराठी विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय, चिंचोली (लिं,), ता. कन्नड, जि. औरंगाबाद.**